# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/09/2023 (शनिवार) दुपार

---

## घरफोडी

**पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत ०३ किमी अंतरावर मौजा पालोरा येथे दिनांक ०७/०९/२०२३ चे १९/३० वा. ते २०/४५ वा. सुमारास फिर्यादी नामे– भाउराव दौलतराव कूहीटे, वय ७९ वर्ष, रा. पालोरा ता. पारशिवनी हे घराला कुलूप लावून आपल्या पुतण्याचे घरी गोकुळाष्टमीचे जेवन करण्यासाठी गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून बेडरूम मधिल लोखंडी कपाटाचे दाराचे लॉक तोडून व कपाटातील लॉकरचे लॉक तोडून आत मध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने एकुण ४३ ग्रॅम किंमती १,७२,०००/– रू. व कपाटाच्या ड्राव्हरमध्ये ठेवलेले नगदी १,१०,०००/–रू असा एकुण २,८२,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिवाजी भताने पो.स्टे. पारशिवनी मो. नं ९५५२८०४३८८ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मौजा सनविजय इंफ्रास्ट्रक्चर कंपनी बुट्टीबोरी येथे दिनांक ८/०९/२०२३ चे १३.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– मनिष विनोद चव्हान, वय ३६ वर्षे, रा. अग्रसेन रोड धरमपेठ नागपूर हे कंपनीचे मॅनेजरसह कंपनीत तयार झालेल्या मालाची पाहणी करण्याकरीता फिरत असतांना तयार केलेल्या लहानमोठया लोखंडी प्लेटा एकुण ०७ नग वजनी २०० किलो किंमती १००/– रू. प्रति किलो प्रमाणे एकुण २०,०००/– रूपयाचा मुद्देमाल कंपनीत ठेवलेल्या जागेवर दिसुन आला नाही. कंपनीत काम करणाऱ्या लोकांना विचारपूस केली त्यांना काहीही माहीत नसल्याचे सांगितले. सदर मुद्देमाल हा कंपनीच्या खुल्या जागेतून कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोना/१७९७ प्रविन देव्हारे मो. नं. ९८२२३९४५९७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर